खेड तालुका शिक्षण प्रसारक मंडळाचे

# हुतात्मा राजगुरू महाविद्यालय राजगुरूनगर

ता. खेड, जि.पुणे

## भूगोल विभाग

## जलकुंड भेट

हुतात्मा राजगुरू महाविद्यालयाच्या भूगोल विभागामध्ये दरवर्षी अनेक उपक्रमाचे आयोजन केले जाते. दि. 17/2/25 रोजी भूगोल विभागामध्ये जलकुंड भेट या उपक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. या उपक्रमाचे आयोजन डॉ. डी.एम.मारकड यांनी केले.

भूगोल विभागातील एस.वाय.बी.ए.च्या पर्यावरण भूगोलामध्ये परिसंस्थेच्या अभ्यासक्रमाचा समावेश आहे. परिसंस्थेचे अनेक प्रकार आहेत. जल परिसंस्था, वन परिसंस्था, सागर परिसंस्था, कृषी परिसंस्था इ. जल परिसंस्थेमध्ये डबके किंवा कुंड परिसंस्था हा एक प्रकार आहे. भूगोल विभागातील विद्यार्थ्यांना कुंड परिसंस्थेचा अभ्यास करण्यासाठी कुंडभेट हा उपक्रम आयोजित करण्यात आला.

हुतात्मा राजगुरू महाविद्यालयाच्या परिसरात सिद्धेश्वराचे जुनाट मंदिर आहे. या मंदिराच्या समोर कठीण पाषाणात बांधलेले जलकुंड आहे. या जलकुंडात अनेक प्रकारचे प्राणी आणि वनस्पती आहेत. दि. 17/02/25 रोजी भूगोल विभागातील विद्यार्थी डॉ. डी.एम.मारकड यांच्या समवेत सिद्धेश्वर मंदिर परिसरात गेले. तेथे सिद्धेश्वराचे दर्शन घेतल्यानंतर विद्याथ्यांना डॉ. डी.एम.मारकड यांनी सिद्धेश्वर मंदिराचे ऐतिहासिक महत्व सांगितले. सिद्धेश्वर मंदिर परिसरात अनेक प्रकारचे वृक्ष आहेत. वड, पिंपह, कदंब, असे उंच उंच वृक्ष आहेत. डॉ. डी.एम.मारकड यांनी या वृक्षांचे महत्व विद्यार्थ्यांना सांगितले. त्यानंतर या वृक्षांवर लटकणारे वटवाघूळ नावाचे प्राणी विद्यार्थ्यांना दाखविले. तसेच डॉ. डी.एम.मारकड यांनी वटवाघळांबद्दल माहिती दिली. परिसंस्थेतील वटवाघळांचे महत्व सांगितले.

त्यानंतर विद्यार्थी कुंडजवळ आले. कुंडाची रचना चौकोनी असून आत पाण्यापर्यंत पायऱ्या गेलेल्या आहेत. आत स्नान केल्यानंतर कपडे बदलण्यासाठी लहान लहान खोल्या आहेत. यांना गुमरिया किंवा ओवऱ्या म्हणतात. जलकुंडाच्या कठड्यावर विद्यार्थी उभे राहिले. त्या कठड्यावरून डॉ. डी.एम.मारकड यांनी विद्यार्थ्यांना कुंडातील पाण्यातील प्राणीजीवन दाखविले. या कुंडातील पाण्यात अनेक प्राणी आहेत. वेगवेगळ्या प्रकारचे मासे, कासव, बेडूक, खेकडे, डिंभक वगैरे प्राणी आहेत. या प्राण्याविषयी डॉ. डी.एम.मारकड यांनी विद्यार्थ्यांना माहिती सांगितली.




जलकुंडातील प्राण्याची विद्यार्थ्यांना माहिती देताना डॉ. डी.एम.मारकड




सिद्धेश्वर मंदिर परिसरातील रमणीय आणि ऐतिहासिक जलकुंड




जलकुंडातील प्राण्याची विद्यार्थ्यांना माहिती देताना डॉ. डी.एम.मारकड